N-5

# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्रमांक : एसजी/ 2124 /टीए
दिनांक : 18/12/25

**विषय :** 'एम/प' विभागातील चेंबूर (पूर्व) गावचा न.भू.क्र. 523, 524 आर. सी. मार्ग, चेंबूर, मुंबई येथे प्रस्तावित पुनर्विकास कामात बाधित वृक्ष कापणे / पुनर्रोपित करणेच्या परवानगीबाबत.

1. "महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975" च्या कलम 8 (6) मधील तरतूदीनुसार काढण्यात येणा-या झाडांची संख्या 25 (पंचवीस) अथवा त्यापेक्षा कमी असल्यास वृक्ष प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्य महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत. तदनुषंगाने महानगरपालिका आयुक्त व अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण यांच्या विचारार्थ प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सदर परवानगी देण्यात आलेल्या प्रस्तावाची नोंद / अभिलेख उद्यान अधिक्षक / वृक्ष अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत ठेवण्यात येईल.
2. मा. उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक 46/2015 मधील दि. 21.02.2018 रोजीच्या आदेशान्वये मा. महानगरपालिका आयुक्त यांना महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 च्या कलम 8 मधील पोट कलम 6 अन्वये प्रधान करण्यात आलेले अधिकार वापरण्यास मज्जाव करण्यात आला होता.
3. सदरहू बाबतीत मा. उच्च न्यायालयाने सुधारीत आदेश दि. 23.04.2018 रोजी पारित केले असुन, त्यात काही अटींसह सुधारणा झाल्या असुन, मा. महानगरपालिका आयुक्त, यांना आपले अधिकार वापरण्यास परवानगी दिलेली आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव पुढील प्रमाणे आहे.

'एम/प' विभागातील चेंबूर (पूर्व) गावचा न.भू.क्र. 523, 524 आर. सी. मार्ग, चेंबूर, मुंबई येथे प्रस्तावित पुनर्विकास कामात बाधित वृक्ष कापणे / पुनर्रोपित करण्यास परवानगी मिळणेबाबतच्या विनंतीचा प्रस्ताव, मे. ऐश्वर्या आर्किटेक्ट्स [M/s. Aishwarya Architects], ह्यांजकडून, मे. सहकार सुवास को.ऑप.हौ.सोसायटी लि., ह्यांजकरीता महानगरपालिका इमारत प्रस्ताव विभागामार्फत देण्यात आलेल्या आय.ओडी. क्र. P-24645/2025/(523 And Other)/M/W Ward/CHEMBUR-W/1/NEW, dt. 28.05.2025 मधील अटी / शर्तीनुसार, दि. 18/09/2025 रोजी 'एम/प' विभाग कार्यालयास सादर केलेला विनंतीचा प्रस्ताव, 'एम/प' विभाग, उद्यान खात्यामार्फत दि. 06/11/2025 रोजी उद्यान खाते, परिमंडळ - 5 कार्यालयास प्राप्त झाला.

1. सदरहू जागेची पाहणी दिनांक 04.11.2025 रोजी उद्यान खात्यातील खालील प्रमाणे अधिकारी

   1) उ.वि.स./ क.वृ.अ. 'एम/प' विभाग :- श्री. गणेश अंभोरे
   2) सहा.उद्यान अधिक्षक 'एम/प' विभाग :- श्री. जगदिश भोईर
   3) उप उद्यान अधिक्षक (परि.-5) :- श्री. सुनिल राठोड

यांनी केली असता असे आढळून आले की, विषयांकित काम प्रस्तावित असलेल्या जागेवर सद्यस्थितीत **एकूण 26 (सव्वीस)** वृक्ष अस्तित्वात असून, त्यापैकी **12 (बारा)** वृक्ष चेंबूर (पूर्व) गावचा न.भू.क्र. 523, 524 आर. सी. मार्ग, चेंबूर, मुंबई येथे प्रस्तावित पुनर्विकास कामात बाधित होत आहेत. यास्तव सदरहू बाधित वृक्षांपैकी **10 (दहा)** वृक्ष (वृक्षाचा क्र. 2, 3, 5, 6, 7, 10, 11, 13, 14 आणि 15) [पृ.क्र. सी- 139 ते 151 आणि 155 ते 159] **कापणे, 02 (दोन)**

वृक्ष (वृक्षाचा क्र. 1 आणि 12) [पृ.क्र. सी- 137 आणि 153] **पुनर्रोपित करणे** व उर्वरित **14 (चौदा)** वृक्ष (वृक्षांचा क्र. 4, 8, 8 ए, 9, 9 ए, 9 बी, 10 ए आणि 16 ते 22) **आहे तसेच ठेवणेकरीता** प्रस्तावित करण्यात येत आहे. पाहणीचा सविस्तर अहवाल यासोबत सादर करण्यात आलेला आहे. (पृष्ठ क्र. सी- 133) व त्या अनुषंगाने पक्षकाराने दि. 31.10.2025 व दि.16.12.2025 रोजी कागदपत्रांची पुर्तता केली. त्याचप्रमाणे, सदरहू प्रस्तावामध्ये कापणे / पुनर्रोपित करणेकरीता प्रस्तावित वृक्षांमध्ये हेरिटेज वृक्षांचा समावेश नाही, याची खात्री करण्यात आलेली आहे.

| अ. क्र | वृक्ष क्र. | जात | वनस्पती शास्त्रीय नाव | अंदाजे उंची (फुट) | अंदाजे घेर (फुट) | वृक्षाचे अंदाजे वय(वर्षे) | कापणे / पुनर्रोपित करणे/ आहे तसेच ठेवणे | कारण / अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | 1 | निम | अझार्डिरक्टा इंडिका | 30'-35' | 2'-3' | 20 | **पुनर्रोपित करणे** | प्रस्तावित इमारतीच्या उत्खननात बाधित होत आहे. |
| 2 | 2 | नारळ | कोकोस न्युसिफेरा | 35'-40' | 3'-4' | 26 | **कापणे** | प्रस्तावित इमारतीच्या उत्खननात बाधित होत आहे. |
| 3 | 3 | नारळ | कोकोस न्युसिफेरा | 40'-45' | 3'-4' | 26 | **कापणे** | प्रस्तावित इमारतीच्या उत्खननात बाधित होत आहे. |
| 4 | 4 | पर्जन्यवृक्ष | समानिया समन | 50'-55' | 8'-10' | 40 | **आहे तसेच ठेवणे** | प्रस्तावित कामात बाधित होत नाही. |
| 5 | 5 | अशोका | पॉलियलथिया लॉन्जिफोलिया | 25'-30' | 3'-4' | 20 | **कापणे** | सदर वृक्ष प्रस्तावित इमारतीच्या उत्खननात बाधित होत आहे. |
| 6 | 6 | नारळ | कोकोस न्युसिफेरा | 45'-50' | 3'-4' | 26 | **कापणे** | |
| 7 | 7 | नारळ | कोकोस न्युसिफेरा | 45'-50' | 3'-4' | 26 | **कापणे** | |
| 8 | 8 | बदाम | टर्मिनालिया कट्टपा | 30'-35' | 2'-3' | 16 | **आहे तसेच ठेवणे** | प्रस्तावित कामात बाधित होत नाही. |
| 9 | 8 ए | फणस | आर्टोकार्पस हेट्रोफाईलम | 35'-40' | 4'-5' | 32 | **आहे तसेच ठेवणे** | प्रस्तावित कामात बाधित होत नाही. |
| 10 | 9 | निम | अझार्डिरक्टा इंडिका | 35'-40' | 4'-5' | 30 | **आहे तसेच ठेवणे** | प्रस्तावित कामात बाधित होत नाही. |
| 11 | 9 ए | खारवट | एरेशिया ॲनाक्युआ | 30'-35' | 3'-4' | 25 | **आहे तसेच ठेवणे** | प्रस्तावित कामात बाधित होत नाही. |
| 12 | 9 बी | निलगीरी | युकॅलिप्ट्स ग्लोब्युलस | 40'-45' | 5'-6' | 30 | **आहे तसेच ठेवणे** | प्रस्तावित कामात बाधित होत नाही. |
| 13 | 10 | नारळ | कोकोस न्युसिफेरा | 40'-45' | 3'-3.6" | 22 | **कापणे** | प्रस्तावित इमारतीच्या उत्खननात बाधित होत आहे. |

| अ. क्र | वृक्ष क्र. | जात | वनस्पती शास्त्रीय नाव | अंदाजे उंची (फुट) | अंदाजे घेर (फुट) | वृक्षाचे अंदाजे वय(वर्षे) | कापणे / पुनर्रोपित करणे/ आहे तसेच ठेवणे | कारण / अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 14 | 10 ए | आंबा | मॅन्जिफेरा इंडिका | 30'-35' | 2'-3' | 18 | **आहे तसेच ठेवणे** | प्रस्तावित कामात बाधित होत नाही. |
| 15 | 11 | फणस | आर्टोकार्पस हेट्रोफाईलम | 30'-35' | 3'-3.6" | 24 | **कापणे** | सदर वृक्ष प्रस्तावित इमारतीच्या उत्खननात बाधित होत आहे. |
| 16 | 12 | नारळ | कोकोस न्युसिफेरा | 40'-45' | 2'-3' | 22 | **पुनर्रोपित करणे** | |
| 17 | 13 | कैलासपती | कोरोपिटा ग्युनॅन्सिस | 30'-35' | 3'-4' | 20 | **कापणे** | |
| 18 | 14 | नारळ | कोकोस न्युसिफेरा | 40'-45' | 3'-3.6" | 26 | **कापणे** | |
| 19 | 15 | नारळ | कोकोस न्युसिफेरा | 35'-40' | 3'-3.6" | 26 | **कापणे** | |
| 20 | 16 | चाफा | प्ल्युमेरिया अल्बा | 20'-25' | 3'-3.6" | 20 | **आहे तसेच ठेवणे** | प्रस्तावित कामात बाधित होत नाही. |
| 21 | 17 | निम | अझार्डिरक्टा इंडिका | 30'-35' | 3'-4' | 25 | **आहे तसेच ठेवणे** | प्रस्तावित कामात बाधित होत नाही. |
| 22 | 18 | पेल्टोफोरम | पेल्टोफोरम फेरुजिनियम | 50'-55' | 8'-9' | 35 | **आहे तसेच ठेवणे** | प्रस्तावित कामात बाधित होत नाही. |
| 23 | 19 | पेल्टोफोरम (मृत) | पेल्टोफोरम फेरुजिनियम | 8'-10' | 1.6"-2' | 19 | **आहे तसेच ठेवणे** | प्रस्तावित कामात बाधित होत नाही. |
| 24 | 20 | अशोका | पॉलियलथिया लॉन्जिफोलिया | 40'-45' | 3'-4' | 20 | **आहे तसेच ठेवणे** | प्रस्तावित कामात बाधित होत नाही. |
| 25 | 21 | पेल्टोफोरम | पेल्टोफोरम फेरुजिनियम | 45'-50' | 6'-7' | 32 | **आहे तसेच ठेवणे** | प्रस्तावित कामात बाधित होत नाही. |
| 26 | 22 | पारिजातक | नॅक्टेन्थस आर्बोर्ट्रिस्टीज | 25'-30' | 2'-2.6" | 14 | **आहे तसेच ठेवणे** | प्रस्तावित कामात बाधित होत नाही. |

4. या प्रकरणी महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975" च्या कलम 8 (6) मधील तरतूदीनुसार सदरहू प्रस्तावाची स्थानिक वृत्तपत्रात दि. 12/11/2025 रोजी जाहिरात देण्यात आलेली आहे व काढणे आवश्यक असलेल्या सर्व झाडांच्या ठळक भागावर नोटीस / सूचना चिकटवण्यात आले असून, सदर नोटीस / सूचनेसहीत झाडांचे छायाचित्र माहितीकरीता ह्या सोबत जोडण्यात आलेले आहेत. (पृष्ठ क्र.सी- 137 ते 159) सदर जाहिरातीमध्ये नमुद प्रस्तावांबाबतची सुनावणी उद्यान अधिक्षक यांच्या दालनात दि. 19/11/2025 रोजी दुपारी 04 : 30 ते 5 :00 या कालावधीत ठेवण्यात आली होती. परंतू, सदरहू प्रस्तावाबाबत दि. 19/11/2025 रोजीपर्यंत प्रत्यक्ष व ई-मेलद्वारे कोणतेही आक्षेप / सूचना प्राप्त झालेले नाहीत. (पृष्ठ क्र.सी- 163).

5. सदर ठिकाणी कापण्यास / पुनर्रोपित करण्यास परवानगी दिल्याच्या बदल्यात वृक्ष प्राधिकरणाच्या मानांकानुसार नवीन लावण्यात येणारी झाडे व पुनर्रोपित करण्यात येणारी झाडे आरे गुग्ध वसाहतीमधील युनिट क्र. 6 येथील पर्यवेक्षिकीय निवासस्थानांच्या बाजूचे तसेच रस्त्यालगतच्या मोकळ्या क्षेत्रामध्ये लावण्यात येतील व नवीन लावण्यात येणा-या झाडांची उंची १२ फुटापेक्षा व घेर ६ इंचापेक्षा कमी नसेल, अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र पक्षकाराने दिलेले आहे. (पृ.क्र.सी-529 ते 532)

6. पक्षकाराने कामाच्या अंमलबजावणीबाबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातील कालावधीबाबत तसेच नविन लावण्यात येणारी झाडे, यांच्या ठिकाणाबाबत फेरफार करावयाचा असल्यास, मा. उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी हे संपूर्ण प्रस्तावाची शहानिशा करुन आवश्यक असल्यास फेरफार करण्यास संमती देतील.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 (दिनांक 16 जानेवारी 2017 पर्यंत सुधारीत) च्या कलम 8 (6) मधील तरतुदींनुसर काढण्यात येणा-या झाडांची संख्या **25** (**पंचवीस**) अथवा त्यापेक्षा कमी असल्यास वृक्ष प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्य महानगरपालिका आयुक्त यांना प्रदान करण्यात आले आहेत व मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या दि. 23.04.2018 रोजीच्या आदेशात खालीलप्रमाणे अटी व शर्ती घालण्यात आले आहे.

1. महानगरपालिका आयुक्त हे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपलब्ध असलेले तज्ञ यांचा सल्ला घेतील व आदेश परित करताना ज्या तज्ञांकडुन सल्ला घेण्यात आला आहे त्यांचे नाव नमूद करतील.
2. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मा. महानगरपालिका आयुक्त यांनी सदर बाबतीत परवानगी दिल्यास सदरबाबतची सुचना स्थानिक वृत्तपत्रात प्रदर्शीत करण्यात यावी व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात यावी. सदरहू सुचना वृत्तपत्र व महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अपलोड झाल्याच्या 21 दिवसांपर्यंत सदरहू परवानगीची अंमलबजावणी करण्यात येणार नाही.
3. महानगरपालिका आयुक्त हे एका विविक्षित भूभागावर एकदाच परवानगी देऊ शकतील.

मा. उच्च न्यायालयाने वरील प्रमाणे दिलेल्या आदेशांचे अनुपालन प्रस्तावीत करण्यात आले आहे व ते खालील प्रमाणे आहे.

1. महानगरपालिकेच्या उद्यान विभागातील खालील तज्ञ अधिका-यांनी स्थळ पाहणी केलेली आहे.
   1) उ.वि.स./ क.वृ.अ. 'एम/प' विभाग :- श्री. गणेश अंभोरे
   2) सहा.उद्यान अधिक्षक 'एम/प' विभाग :- श्री. जगदिश भोईर
   3) उप उद्यान अधिक्षक (परि.-5) :- श्री. सुनिल राठोड
2. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मा. महानगरपालिका आयुक्त यांनी सदरबाबतीत परवानगी दिल्यास , सदरबाबतची सुचना स्थानिक वृत्तपत्रात प्रदर्शीत करण्यात येईल व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल. सदरहू सुचना वृत्तपत्र व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेरस्थळावर अपलोड झाल्याच्या 21 दिवसांपर्यंत सदरहू परवानगीची अंमलबजावणी करण्यात येणार नाही.
3. सदर भूभागावर यापुर्वी मा. महानगरपालिका आयुक्त / अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरणाकडुन कोणतेही परवानगी देण्यात आलेली नाही. नियमांनुसार / आदेशानुसार आवश्यक ती अर्ज प्रक्रिया शुल्क व अनामत रक्कम स्विकारल्यानंतर तसेच निकषानुसार आवश्यक ती नवीन झाडे लावण्याच्या अटीसह परवानगी देण्यात येईल.

यास्तव, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम 1975 च्या कलम 8(3)(क) मधील तरतुदीनुसार, 'एम/प' विभागातील चेंबूर (पूर्व) गावचा न.भू.क्र. 523, 524 आर. सी. मार्ग, चेंबूर, मुंबई येथे प्रस्तावित पुनर्विकास कामात बाधित वृक्ष कापणे/ पुनर्रोपित करणेबाबत खालील प्रमाणे प्रस्ताविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कारण | कापणे | पुनर्रोपित करणे | आहे तसेच ठेवणे | एकुण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | प्रस्तावित इमारतीकरीता उत्खननात बाधित. | **10 (दहा)** वृक्ष (वृक्षाचा क्र. 2, 3, 5, 6, 7, 10, 11, 13, 14 आणि 15) | **02 (दोन)** वृक्ष (वृक्षाचा क्र. 1 आणि 12) | --- | **12** | कापणे / पुनर्रोपित करणेकरीता प्रस्तावित. |
| 2. | अबाधित /आहे तसेच ठेवणे | --- | --- | **14 (चौदा)** वृक्ष (वृक्षांचा क्र. 4, 8, 8 ए, 9, 9 ए, 9 बी, 10 ए आणि 16 ते 22) | **14** | प्रस्तावित कामात अडथळा करीत नाही. |
| **एकूण** | | **10** | **02** | **14** | **26** | |

उपरोक्त तक्त्यात नमुद केल्यानुसार अ. क्र. 1 मधील 10 वृक्ष कापणे, 02 वृक्ष पुनर्रोपित करणे व अ.क्र. 2 मधील 14 वृक्ष अबाधित असल्याने आहे तसेच ठेवणेकरीता प्रस्तावित येत आहे.

सदर प्रस्तावाची पडताळणी करण्यात आलेली असून, यथायोग्य असल्याने मंजूरी करिता शिफारस करण्यात येत आहे.

**उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी**

**मा. उप आयुक्त (उद्याने)**
महोदय,

06/01/26
उप आयुक्त (उद्याने)

**मा. महानगरपालिका आयुक्त / अध्यक्ष, वृक्ष प्राधिकरण**
महोदय,

महानगरपालिका आयुक्त

उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी

N-15

## कापणे / पुनर्रोपित करणेकरीता प्रस्तावित झाडांची सूची

| अ.क्र. | वृक्षाची जात | एकूण कापणे संख्या | एकूण पुनर्रोपित संख्या |
|---|---|---|---|
| 1 | निम | 00 | 01 |
| 2 | नारळ | 07 | 01 |
| 3 | अशोका | 01 | 00 |
| 4 | फणस | 01 | 00 |
| 5 | कैलासपती | 01 | 00 |
| **एकुण** | | **10** | **02** |